# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# प्रशांतचंद्र महालनोबिस यांचे कार्य जगाला मार्गदर्शक

## प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांचे प्रतिपादन, देसाई महाविद्यालयात राष्ट्रीय संख्याशास्त्र दिन

वार्ताहर

पाटण

आंतरराष्ट्रीय दर्जाचे भारतीय संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महालनोबिस यांनी आपले संपूर्ण जीवन सांख्यिकी शास्त्राच्या विकासासाठी समर्पित केले. त्यांनी 'महालनोबिस अंतर' या सांख्यिकीय मापनाचा शोध लावला. तसेच भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिकरणासाठी भारताचे धोरण तयार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी भारतीय सांख्यिकी संस्थेची स्थापना करून राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण सुरू केले. आर्थिक विकास व सांख्यिकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे भारतीय संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महालनोबिस यांचे कार्य जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन येथील बाळासाहेब देसाई कॉलेजच्या आयक्युएसी समन्वयक प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेजच्या संख्याशास्त्र



**पाटण : प्रशांतचंद्र महालनोबिस यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. डॉ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. एस. आर. सुपनेकर.**

विभागाच्या वतीने राष्ट्रीय संख्याशास्त्र दिन तसेच प्रशांतचंद्र महालनोबिस यांची जयंती कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ.एस. डी. पवार, संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. आर. सुपनेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. सौ. काटे म्हणाल्या, संख्याशास्त्र हे समाजाच्या वास्तवाचा आरसा आहे. साहित्यशास्त्र आणि संख्याशास्त्र अथांग आणि व्यापक असून ते एकमेकांवर अवलंबून आहेत. संख्याशास्त्र हे माणसाच्या जीवनाशी निगडित आहे. महाविद्यालयाने या दिनाच्या निमित्ताने या वर्षीची राष्ट्रीय संख्याशास्त्राची संकल्पना घेऊन अभिनव उपक्रम राबवावा.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, मानवी जीवनात विविध स्वरूपाची माहिती जमवणे, तिचे विश्लेषण करणे, स्पष्टीकरण देणे आणि आलेले अनुमान सारांश रुपाने प्रस्तुत करणे, हे काम संख्याशास्त्र करत असते. संख्याशास्त्रामुळेच आज सर्व ज्ञानशाखा समृद्ध झाल्या आहेत.

प्रा. डॉ. संजय सुपनेकर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. डी. डी. थोरात यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.